# जाहिरात

# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २००९

**जाहिरात क्रमांक आस्था-२/पो.भ/ २०१० ठिकाण-सोलापूर दिनांक ०५/०२/२०१०**

राज्य राखीव पोलीस बल गट क्र,१० सोलापूर पोलीस बलात दि.०८.०३.२०१० रोजी पुरुष वर्गासाठी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे. उमेदवारांने या कार्यालया मार्फत प्रसिध्द करण्यात आलेले आवेदन अर्ज खाली सूचना १ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येतील. आवेदन अर्ज उमेदवारांना रू.५०/- इंडियन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट " **समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. १०, सोलापूर"** या नावाने जमा केल्यानंतर देण्यात येतील. विहीत आवेदन अर्ज भरून आवश्यक त्या कागदपत्रासह व्यक्तिशः समादेशक रा.रा.पो.बल गट क्र १०, सोलापूर (सोरेगाव) या ठिकाणी दि.०८.०३.२०१० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यतच येणा-या उमेदवारांना प्रवेश दिला जाईल. त्यानंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

राज्य राखीव पोलीस बल गट क्र १०, सोलापूर पोलीस बलात खाली दर्शविल्याप्रमाणे पोलीसांची रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे.

**१) पोलीस शिपाई :**

| पद | अजा | अज | विमाप्र | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पो.शिपाइ | २३ | १७ | ०१ | ०० | ०३ | ०० | ०० | ०७ | ७२ | १२३ |

**२) बँडस्मनची पदे रिक्त नाहीत.**

- **खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, गृहरक्षक दल यांचे करीता असलेले आरक्षण हे संमातर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ट आहे. (संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.-३१/९८/१६-अ दिनांक १६.०३.१९९९)**
- **ज्या उमेदवारांनी यापुर्वी दि. १०.०८.२००९ व दि. ०९.११.२००९ रोजी जाहिर केलेल्या पोलीस भरतीसाठी आवेदन अर्ज या कार्यालयाकडून घेतेलेले आहेत ते ओवदन अर्ज या भरतीस ग्राहय धरण्यात येतील. त्यांनी पुन्हा नविन अर्ज घेण्याची आवश्यकता नाही.**

**टिप-** वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असु शकते, त्यामध्ये बदल करण्याचे आधिकार हे सक्षमप्रधिका-यास राहतील. **सदरची पदे मागील अनुशेष विचारात घेवून दर्शविण्यात आलेली आहेत.**

**वेतनश्रेणी-** शासन वित्त विभाग अधिसूचना क्र. वेपूर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९, दि.२२/०४/२००९ अन्वये पोलीस शिपाई पदाकरीता मंजूर करण्यात आलेल्या वेतनश्रेणीनुसार अनूज्ञेय वेतन व भत्ते. शासन निर्णय अं.नि.ओ. १००५५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये नियुक्तीस पात्र ठरणा-या पोलीस शिपायांस "परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू ठरेल.

**वयोमर्यादा-** दि.२८.०२.२०१० रोजी वय १८ वर्ष पूर्ण आणि २५ वर्षापेक्षा अधिक नसावे, मागासवर्गीयांना ५ वर्षे शिथिलक्षम.

**शैक्षणिक अर्हता -** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१ ) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागिय मंडळाकडुन घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकेंडरी स्कूल परिक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परिक्षा हया राज्य मंडळातर्फे घेण्यात येणा-या १२ इयत्तेच्या परिक्षेशी समकक्ष आहेत) घोषित केलेली परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**शारिरीक पात्रता :-** पुरुष : किमान उंची : १६८ से.मी
छाती : न फुगवता ७९ से.मी
(न फुगविलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी.पेक्षा कमी नसावा)

**चाचणी -** शारिरीक पात्रता पूर्ण करणा-या उमेदवाराची १०० गुणांची शारिरीक चाचणी, ७५ गुणांची लेखी चाचणी आणि २५ गुणांची मुलाखत चाचणी घेण्यात येईल.

**शारिरीक चाचणी खालील प्रमाणे राहिल :-**

**पुरुष :-** (१) १०० मिटर्स धावणे (२)८०० मिटर्स धावणे, (३) पुल अप्स (१०) (४) लांब उडी (५) गोळा फेक

**लेखी चाचणी खालील प्रमाणे राहिल :-**

(१) अंकगणित (२) सामान्यज्ञान व चालु घडामोडी (३) मराठी भाषेत निबंध लेखन

**गृहरक्षक दल (होमगार्ड ) आरक्षण-** एकुण पदांच्या ५% इतके समांतर आरक्षण पदे गृहरक्षक दलातून भरण्यात येतील. उमेदवाराची भरतीच्या दिनांका पूर्वी अथवा भरतीच्या नियोजित दिनांकापर्यंत गृहरक्षकदलामध्ये कमीत कमी ३ वर्ष सेवा झालेली असणे आवश्यक आहे.

**माजी सैनिक आरक्षण-** एकुण पदांच्या १५% इतके समांतर आरक्षण पदे ही माजी सैनिकातून भरण्यात येतील. तसेच त्यांच्या वयामध्ये त्यांची सैन्यदलात जितकी सलग सेवा (सहा महिन्यांपेक्षा कमी नाही) झाली असले तेवढे वर्षे अधिक ३ वर्षे सवलत देय राहील.

**धरणग्रस्त/ प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त आरक्षण-** सामन्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. भुकंप-१००९/प्रक्र २०७/२००९/१६-अ दि. २७/८/०९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५% समांतर आरक्षण त्यांच्यासाठीच राखुन ठेवून या आरक्षणांतर्गत भुकंपग्रस्तासाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तासाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू राहिल. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती सदर उमेदवारांना पोलीस भरतीच्या वेळी देय राहतील.

**खेळाडु उमेदवार-** एकुण पदाच्या घटक निहाय ५% पदे खेळाडु उमेदवारातून भरण्यात येतील. खेळाडुबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती व निर्देशानुसार भरण्यात येतील. सदरची सुट फक्त पुढे नमूद क्रिडा कामगिरी करण्या-या खेळाडूसाठीच देय राहील. **(१) राज्यस्तर (आंतरजिल्हा) पदक विजेता (२) आंतर विद्यापीठ स्तर प्रतिनिधित्व (३) राष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व (४) आंतरराष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व.**

**खेळाची नावे-**

| | | |
|---|---|---|
| १. आर्चरी (धनुविद्या ) | २) अॅथलेटिक्स व क्रॉस कन्ट्री | ३) अॅक्वेटिक्स (पाण्यातील खेळ) |
| ४) बॅडमिंटन | ५) बॉक्सींग | ६) बास्केटबॉल |
| ७) जिम्नॅस्टिक्स | ८) हॅण्डबॉल | ९) खो-खो |
| १०) ज्युडो | ११) कबड्डी | १२) रोवींग |
| १३) लॉन टेनिस | १४) शुटींग | १५) वेटलिफ्टींग |
| १६) टेबल टेनिस | १७) व्हॉलीबॉल | १८) तायक्वांदो |
| १९) कुस्ती | २०) हॉकी | २१) बिलीयर्डस व स्नूकर |
| २२) फूटबॉल | २३) कराटे | २४) पॉवर लिफ्टींग |
| २५) बॉडी बिल्डींग | २६) क्रिकेट | २७) कॅनोईग-कयाकिंग (होडी वल्हविणे) |
| २८) रग्बी | | |

तसेच पुरुष खेळांडुना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ से.मी.इतकी सूट देय राहिल.

**टिप – खेळाडू उमेदवारांनी त्यांचे खेळ विषयाचे प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून तपासणी केलेले असणे आवश्यक आहे.**

**अर्जदारासाठी आवश्यक सूचना :**

१) "आवेदन अर्ज " हे खालील ठिकाणी दि. ०८.०२.२०१० ते ०५.०३.२०१० रोजी सकाळी १०.०० ते १७.३० वाजेपर्यत वितरीत केले जातील.

ठिकाणांचे नांवे : - १. पोलीस निरीक्षक कल्याणकारी शाखा, रारापोबल गट क्र.१०, सोरेगाव, सोलापूर.

२) आवेदन अर्ज घेताना रु.५०/- चा इंडीयन पोस्टल ऑर्डर किंवा राष्ट्रीय कृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट **"समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१०, सोलापूर"** यांचे नांवाने देण्यांत यावा.

३) छाननीच्या वेळी मुळ प्रमाणपत्रे दाखविणे बंधनकारक आहे.

४) अर्जदारांने अर्जासोबत खालील (लागू असलेल्या) प्रमाणपत्राची सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिका-यानं स्वाक्षंकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

१. शाळा सोडल्याचा दाखला.

२. शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक

**३. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.बीसीसी २००९/प्रक्र २९१/०९/१६-ब, दि.५/११/२००९ नूसार मागासवर्गी उमेदवाराने जात वैद्यता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक**

**राहिल. अर्जदारांनी जात वैद्यता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.**

४. प्रकल्पग्रस्त असल्यास त्याबाबत जिल्हा पुर्नवसन अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र

५. अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र

६. सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेले निष्कर्ष व अटीनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन-क्रिमीलियर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र

७. विविध आरक्षण प्रवर्गात मोडण्या-या उमेदवारांने संबंधित प्रवर्गाचे प्रमाणपत्र

प्रमाणपत्र छाननीच्या वेळी उमेदवारांनी उपरोक्त मूळ (Original) प्रमाण पत्रे दाखवणे बंधनकारक आहे. मुळ प्रमाण पत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल. तसेच वरील सर्व प्रमाणपत्रे हे भरतीच्या दिनांका पुर्वीचे असणे आवश्यक आहे.

१) सर्व अटीची व आवश्यक त्या सर्व कागदपत्राची पुर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करण्यांस पात्र राहतील.

२) सदर पोलीस भरतीची विस्तृत माहिती www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध राहील.

३) पोलीस भरतीतील प्रत्येक प्रकियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

४) पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीक ईजा / नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

५) भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविल्यास येईल.

(एस.एस.रंडाळे)
समादेशक,
रा.रा.पो.बल गट क्र.१०,सोलापूर.

**तातडीचे/कालमर्यादा** **पत्र**

प्रति,

उपसंचालक (माहिती)
विभागीय कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत,पुणे -१

जा.क्र. आशा-२/भरती जाहिरात/ **७४५** /२०१० सोलापूर, दि. ०२/०२/२०१०

**विषय :- निवीदा सुचना /जाहिरात प्रसिध्द करणेबाबत**

।।।।।

महोदय,

उपरोक्त विषयान्वये रा.रा.पो.बल गट क्रमांक १० सोलापूर येथे रिक्त असणारे पोलीस शिपाई या पदाची भरती दिनांक ०८/०३/२०१० रोजी आयोजित करण्यात येणार असल्याने सदर जाहिरात प्रसिध्दी करावयाची आहे.

१) कार्यालयाचे नाव :- समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१० सोलापूर
२) जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक :- ०५.०२.२०१०
३) बिल कोणाकडे पाठवावे :- समादेशक रा.रा.पो.बल गट क्र.१० सोलापूर
४) जाहिरा प्रसिध्दीचे स्वरुप :- ब वर्ग
५) कोणत्या क्षेत्रात सदरचे कार्यक्षेत्र येते :- सोलापूर जिल्हा
६) किती वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करावायाची :- जादा खप असलेले कोणत्याही एका मराठी वृत्तपत्रामध्ये आतील बाजुस
७) जाहिरात किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे :- एकच वेळेस

तसेच सदर बाबतची जाहिरात ही कोणत्या वृत्तपत्रात देण्यात येणार आहे या बाबतची माहिती देखील या कार्यालयास सदरचे पत्र घेऊन येणारे पोलीस अधिकारी यांचेकडे देण्यात यावी ही विनंती .

(एस.एस.रंडाळे)
समादेशक
रा.रा.पो.बल गट क्र.१० सोलापूर

मार्फत - स्थानिक कंपनी नायक, गट क्र. १०, सोलापूर

२/- सदर कामाकरीता पोउपनि/यु.व्ही.खराडे नेमणुक स्थानिक कंपनी यांची नियुक्ती करुन त्यांना आज दि. ०२/०२/२०१० रोजी सायंकाळी सदर कामी रवाना करावे व तेथील अधिकारी यांचेशी भेटून चर्चा करुन मिळालेली मंजुरीबाबत या कार्यालयास दुरध्वनीवरुन तात्काळ कळविण्यात यावे आणि सदर बाबत मंजुरी प्राप्त करुन घेवून पुढील कार्यवाही करावे.

<u>**पत्र**</u>

प्रति,

संपादक,
दैनिक सकाळ/दैनिक संचार,
होडगी रोड, सोलापूर

जा.क्र. आशा-२/भरती/जाहिरात/ /२०१० सोलापूर, दि. /०२/२०१०

संदर्भ :- उपसंचालक (माहिती) विभागीय कार्यालय, पुणे यांचे नावे पाठविलेले या कार्यालयाचे पत्र क्र. आस्था-२/भरती/७४५/२०१० दि. ०२/०२/२०१०

**विषय :- जाहिरात प्रसिध्दीबाबत...**

।।।।।

महोदय,

वरील नमूद संदर्भ व विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, या गटात दि. ०८/०३/२०१० रोजी सशस्त्र पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात आलेली आहे. त्याबाबतची जाहिरात प्रसिध्दीस मंजुरी मिळणेबाबतचे पत्र उपसंचालक (माहिती), विभागीय कार्यालय, पुणे यांचे नावे वरील संदर्भान्वये पाठविले असता त्यांनी दि. ०५/०२/२०१० चे दैनिक सकाळ व दैनिक संचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी पाठविणेबाबत दुरध्वनीव्दारे इकडील कार्यालयास कळविलेले आहे. तरी या सोबत पाठविलेल्या जाहिरातीची प्रत प्रसिध्दीसाठी जोडली आहे. सदरची जाहिरात दि. ०५/०२/२०१० रोजी प्रसिध्द होणाऱ्या दैनिकातील आतील पानावर प्रसिध्द होणेस विनंती आहे. जाहिरात क्रमांक व दिनांक सोबतच्या जाहिरातीत नमूद केला आहे. तो सुध्दा जाहिरातीमध्ये समाविष्ठ करावा ही विनंती.

(एस.एस.रंडाळे)
समादेशक
रा.रा.पो.बल गट क्र.१० सोलापूर

प्रत - रक्षक जमादार, गट क्र. १०, सोलापूर
२/- यासोबत जोडण्यात आलेली जाहिरात गटहजेरीवर वाचून दाखविण्यात यावी व सदरची जाहिरातीची प्रत नोटीस बोर्डावर डंकविण्यात यावी.

**फॅक्स**

प्रति,

मा. अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

जा.क्र. आशा-२/भरती/जाहिरात/ /२०१० सोलापूर, दि. /०२/२०१०

संदर्भ :- १) आपलेकडील ई-मेल संदेश क्र. प्रशि/पोशि-भरती/वेळापत्रक/३४५/०९ दि. २५/१/२०१०
२) आपलेकडील ई-मेल संदेश क्र. प्रशि/पोशि-भरती/४३०/०९ दि. ३०/१/२०१०

**विषय :- पोलीस भरती २००९ बाबत...**

।।।।।

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, या गटाचे आस्थापनेवर दि. ०८/०३/२०१० रोजी पोलीस शिपाई या पदाची १२३ पदाकरीता पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली असून सदर पोलीस भरतीची जाहिरात दि. ०४/०२/२०१० रोजी सोलापूर जिल्हयातील जास्तीत जास्त खपाच्या दैनिक सकाळ व दैनिक संचार मध्ये प्रसिध्द करण्याकरीता देण्यात आलेली होती. सदरच्या पोलीस भरतीची जाहिरात दि. ०५/०२/२०१० रोजी प्रसिध्द झालेल्या दैनिक सकाळ व दैनिक संचार या वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेली आहे. तरी वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या पोलीस भरतीच्या जाहिरातीची प्रत सोबत जोडून सादर करीत आहोत.

(एस.एस.रंडाळे)
समादेशक
रा.रा.पो.बल गट क्र.१० सोलापूर

**प्रत सविनय सादर –**

१) मा. अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.रा.मुंबई
२) मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, रारापोबल, पुणे परिक्षेत्र पुणे.